पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय मतदार दिवस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी १३ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त लोकशाही परंपरांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिज्ञा ग्रहण उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यापीठाच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ डेमॉक्रसी अँड इलेक्शन्स फॉर गुड गव्हर्नन्स' तर्फे हा कार्यक्रम घेण्यात आला. केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी मतदारांसाठीच्या प्रतिज्ञेचे वाचन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
26 JAN 2023 पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वसमावेशक ज्ञान आत्मसात करावे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्या र्थ्यांना वेगवेगळ्या माध्यमातून करिअर घडविता येते. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वसमावेशक ज्ञान आत्मसात करावे, असे प्रतिपादन पुणे विभागीय सहनिबंधक डॉ. संजयकुमार भोसले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे राज्यशास्त्र विषयातील राजमार्ग : विविध क्षेत्रातील यशस्वीतांची यशोगाथा या विशेष ऑनलाईन व्याखानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. निलेश बनसोडे होते. याप्रसंगी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे यांची प्रमुख उपस्थित होते. डॉ. भोसले म्हणाले, विद्यार्थ्यांनी माहितीच्या जगात कोणतेही ज्ञान घेताना ते करिअरशी सुसंगत असल्याचा विचार व अभ्यास करून घ्यावे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना विधी व ज्ञान यांची माहिती असणे आवश्यक आहे. राज्यसंस्था, राजकीय प्रक्रिया व प्रशासन माहित असलेल्या विद्यार्थ्यांनी राजकारणात उतरले पाहिजे. प्रास्ताविक समन्वयक प्रा.डॉ.के.बी.पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.सूर्यकांत गायकवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा.डॉ.सचिन भोसले यांनी केले. वैभव पाटील यांनी आभार मानले.

26 JAN 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# म. शिंदे सर्वसमावेशक राष्ट्रवादाचे प्रणेते


## डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठातील चर्चासत्राचा समारोप

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : 'अपृश्यता निवारण आणि जातिभेद नष्ट करणे हे महर्षी शिंदे यांच्या जीवनाचे ध्येय होते. ते सर्वसमावेशक राष्ट्रवादाचे प्रणेते होते', असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी शिंदे शतकोत्तर सुवर्णजयंती वर्षानिमित्त आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहातील 'महर्षी शिंदे आणि सर्वसमावेशक भारताची संकल्पना' या विषयावरील चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाले, 'भारतीय अस्पृश्यतेचे मूलभूत चिंतन महर्षींचे जीवित कार्य होते. विचारवंताच्या विचारधारेमध्ये न सामावणारे



डॉ. जयसिंगराव पवार.

त्यांचे व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते.'

या चर्चासत्रात विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, प्र-कुलगुरू प्रमोद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, किशोर बेडकिहाळ उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले.

### विविध वक्त्यांची मांडणी...

■ या चर्चासत्रात दुसऱ्या दिवशी 'महर्षी शिंदे आणि भारतविषयक संकल्पना - राजकारण आणि इतिहासदृष्टी' या विषयावर डॉ. अवनीश पाटील, प्रकाश पवार, टी. एस. पाटील यांनी, तर 'महर्षी शिंदे आणि भारतविषयक संकल्पना - समाजशास्त्रीय लेखन व स्त्रीविषयक दृष्टिकोन' या विषयावर प्रा. श्रुती तांबे, भारती पाटील, गोविंद काजरेकर यांनी विचार मांडले. 'महर्षी शिंदे यांचे वाङ्मय आणि भारतविषयक संकल्पना' या विषयावर डॉ. दत्ता घोलप, सुशील धसकटे, प्रवीण बांदेकर यांनी मांडणी केली.

### अस्पृश्यता निवारणाचा पाया महर्षी शिंदेंनी घातला : बेडकिहाळ

दरम्यान, चर्चासत्रात पहिल्या दिवशी ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांचे बीजभाषण झाले. ते म्हणाले, 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य बहुआयामी आहे. त्यांनी कारस्थानी सिद्धांताला विरोध करून बहुजनवादी राजकारणाला एक वेगळा आयाम दिला. त्यांनी देशातील अस्पृश्यता निवारण चळवळीचा संस्थात्मक पाया घातला.'

चर्चासत्रात पहिल्या दिवशी प्रा. गुरू आणि प्रा. चौसाळकर या वक्त्यांनी मांडणी केली. 'महर्षी शिंदे आणि भारतविषयक संकल्पना- धर्मचिंतन' या विषयावरील दुसऱ्या सत्रात हेमंत राजोपाध्ये, प्रा. जयसिंग सावंत, प्रा. लवटे या वक्त्यांनी मांडणी केली.

सकाळ

# ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धा उद्यापासून रंगणार

कोल्हापूर, ता. २५ : फ्री स्टाईल गटातील प्रेक्षणीय लढतीनंतर आता शिवाजी विद्यापीठात शुक्रवार (ता. २७) पासून आंतरविद्यापीठ ग्रीको रोमन प्रकारातील कुस्ती स्पर्धा रंगणार आहे. विविध वजनी गटांत होणाऱ्या स्पर्धेत देशभरातील विविध १५० विद्यापीठांमधील सुमारे ८०० मल्ल सहभागी होणार आहेत.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्ष आणि शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवनिमित्त अखिल भारतीय विद्यापीठ महासंघातर्फे फ्रीस्टाईल आणि ग्रीको रोमन गटात कुस्ती स्पर्धा आयोजित केली आहे. त्यातील फ्री स्टाईल प्रकारातील स्पर्धेंचा समारोप मंगळवारी झाला. आता ग्रीको रोमन प्रकारातील स्पर्धा शुक्रवार ते रविवार (ता. २९) होईल. त्यात पहिल्या दिवशी ५५, ६३, ७२, ८२ किलो वजनगट, शनिवारी ६०, ६७, ७७, ९७ आणि रविवारी ८७ आणि १३० किलो वजनी गटातील लढती होतील. स्पर्धेतील पहिल्या आठ क्रमाकांच्या विजेत्या मल्लांची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड होणार आहे.

## आंतरराष्ट्रीय मल्ल लढले...

- फ्री स्टाईल प्रकारात आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त मल्ल लढले. त्यात सुमित, अनिल, अमितकुमार, उदित, मोहित, सुशील, सागर, सोमवीर, अक्षयकुमार, आकाश अंटिल, अनिरुद्ध (हरियाणा) यांचा समावेश होता. त्यांचे कुस्तीतील तंत्र अनेकांना समजून घेता आले, अशी माहिती कुस्ती स्पर्धेचे तांत्रिक संचालक डॉ. बंकट यादव यांनी दिली.

तरूण भारत

# महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्य उपेक्षितच

## ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनातील विविध पैलूंवर अभ्यास केला पाहिजे. कारण तरूण पिढीला वि. रा. शिंदे यांच्या विचारांची गरज आहे. त्यांच्या कार्याची दखल फारशी घेतली नाही. त्यामुळे त्यांचे कार्य उपेक्षित राहिले, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त या कार्यशाळेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. याप्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, महर्षी वि. रा. शिंदे यांचे कार्य स्वातंत्र्यापूर्वीचे आहे. त्याकाळी त्यांनी शेती, समाज सुधारण्यासाठी उपस्थित केलेले प्रश्न आजही जसेच्या तसे आहेत. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रा. गोपाळ गुरु, प्रा. अशोक चौसाळकर, प्रा. सुनीलकुमार लवटे, ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, प्रा. प्रकाश पवार, डॉ. अवनिश पाटील आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात व्यवस्थापन परिषदेचे ८ फेब्रुवारीला मतदान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या आठ सदस्यपदासाठी निवडणूक ८ फेब्रुवारी रोजी होणार आहे. मतदानाची तारीख जाहीर झाल्याने शिक्षक व पदवीधर मतदार गटात इच्छुकांमध्ये चुरस आहे. आठ जागांसाठी त्यासाठी मोर्चेबांधणीला वेग आला आहे. पदवीधर गटात इच्छुकांची संख्या मोठी असून विद्यापीठ विकासासाठी हातभार लावणाऱ्या उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. व्यवस्थापन परिषदेचा २८ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज भरावयाचा आहे. ३० जानेवारीला अर्जांची छाननी केली जाईल. १ फेब्रुवारीपर्यंत अर्ज माघार घेण्यासाठी मुदत आहे. अर्ज अवैधतेसाठी २ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावा. पात्र उमेदवारांची अंतिम यादी ३ फेब्रुवारी प्रसिध्द होणार आहे. तर ८ फेब्रुवारीला मतदान व मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. त्यामुळे इच्छुकांनी आपणच निवडून यावे, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. मोर्चेबांधणीच्या बैठकांनी जोर धरला आहे. शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून या निवडणूकीची जोरदार तयारी सुरू आहे.